कौ.हि.म.सं. अर्ज क्र. २०४/२०२२
आफरीन व इतर २ वि. नईम व इतर ९

## अंतरीम खावटी चा अर्ज नि.क्र.५ वर आदेश

मुळ अर्ज क्र. २०४/२०२२ हा कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे दाखल झाला आहे. सदर प्रकरणात सामनेवाले क्र.१ ते ३ हे हजर झाले आहेत. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ कडुन अंतरिम खावटीचा आदेश मिळण्यासाठी सदरचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ नुसार दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जात अर्जदाराने ती कौटूंबिक हिंसाचाराची व्यथित व्यक्ती असल्यामुळे मुळ अर्जाचा अंतिम आदेश होई पावेतो तिला तिच्याकरीता दरमहा रक्कम रु.१०,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ करीता प्रत्येकी दरमहा रक्कम रु.७,५००/– मात्र अंतरीम खावटी सामनेवाला क्र.१ यांचेकडुन मिळण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

३) अर्जदाराने प्रस्तुत अर्जात असे नमुद केले आहे की, तिचा सामनेवाला क्र.१ याचेसोबत दि.१७/०४/२०११ रोजी मौजे खेडगाव, ता.चाळीसगाव येथे विवाह झाला. लग्नात तिचे आईवडिलांनी तिचे अंगावर दागदागिने घालुन, मानपान करुन भरपूर दानदहेज भेटवस्तु देवुन लग्न लाऊन दिले. सदर लग्नसंबंधातुन तिला सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्ये आहेत. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, विवाहानंतर ती सामनेवाला यांचेकडे सासरी नांदावयास गेली. त्यावेळी सामनेवाले हे संगनमताने तिचा सतत शारीरिक व मानसिक छळ करीत असत. सामनेवाला क्र.१ हा तिला सतत शिवीगाळ करीत असे, तिचा अपमान करीत असे, तिला टोमणे मारीत असे, तिला मोलकरणी सारखी वागणुक देत असे. तसेच तिला वारंवार तलाक देण्याची धमकी देवुन तिला माहेरी पाठवुन देत असे. परंतु दरवेळी तिचे आईवडील हे बैठका घेवुन त्यांना समजावुन अर्जदारास नांदण्यास पाठवित असत. दरम्यानच्या काळात अर्जदार हिस

सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार क्र.२ व ३ ही अपत्ये झाली. परंतु सामनेवाले यांचे वागणुकीत काही बदल झाला नाही. सामनेवाला नं.१ हा सुमारे चार पाच दिवस घराबाहेर राहत असे, घरात किराण भरीत नसे, मुलांकडे दूर्लक्ष करुन वेळप्रसंगी त्यांना दवाखाना सुध्दा करीत नसे. तसेच सामनेवाले यांनी दि.०८/०६/२०२१ रोजी नविन रिक्षा घेणेसाठी अर्जदाराकडे तिचे माहेरुन एक लाख रुपये आणावे अशी मागणी करुन तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिच्या अंगावरील दागदागीणे हिसकावुन घेवुन तिला दोन्ही मुलांसह नेसत्यावस्त्रनिशी माहेरी हाकलुन दिले. त्यानंतर सामनेवाला नं.१ याने अर्जदारास नांदण्यास घेवुन जावे म्हणुन वेळोवेळी फोन करुन व मध्यस्थी मार्फत विनंती करुन देखील सामनेवाल्यांनी त्यास स्पष्ट नकार दिला व तलाक देण्याची धमकी दिली. तसेच दि.०३/०८/२०२१ रोजी जळगाव येथील महाजन हॉस्पीटल मध्ये अर्जदाराचे ऑपरेशन झाले. तेथे देखील सामनेवाला नं.१ हा अर्जदारास भेटण्यास आला नाही. त्यानंतर अर्जदार हिने महिला दक्षता समिती, जळगाव येथे सुध्दा तिला नांदण्यास घेवुन जाणेबद्दल अर्ज करुन प्रयत्न केले. परंतु तेथेही सामनेवाले हे आले नाहीत. त्यानंतर दि.०७/०८/२०२२ रोजी दुपारी १–०० वाजेच्या सुमारास सर्व सामनेवाले हे अर्जदाराचे माहेरी आले व त्यांनी अर्जदाराकडे पैशाची मागणी करुन तलाक देण्याची धमकी देऊन अर्जदारास शिवीगाळ व मारहाण केली. त्यामुळे अर्जदाराने सामनेवाले यांचेविरुध्द मेहुणबारे पोलीस ठाण्यात गु.र.नं. २०१/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

४) अर्जदार हिचे पुढील कथन असे आहे की, सामनेवाले यांनी तिला टाकुन घातल्यापासुन तिच्या परिरक्षणाची काहीएक काळजी घेतली नाही. अर्जदाराला कोणताही कामधंदा येत नसल्याने व तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट सामनेवाला क्र.१ याचे धुळे येथे सुपर बँगल्स या नावाने बांगडीचे दोन मजली दुकान असुन ते होलसेल आणि रिटेल मध्ये बांगडया आणि कॉस्मेटीक वस्तु विक्रीचा व्यापार करतात. त्यापासुन त्याला महिन्याला ७० ते ८० हजार रुपये उत्पन्न मिळते. शिवाय इतर सामनेवाले यांचे स्वतःचे व्यवसाय आहेत. तसेच सामनेवाला क्र.१ वर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सामनेवाला यांचेकडुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत

तिच्यासाठी दरमहा रक्कम रु.१०,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांचेसाठी प्रत्येकी दरमहा रक्कम रु.७,५००/– मात्र अंतरिम पोटगी मिळण्याची मागणी केलेली आहे.

५) याउलट सामनेवाले क्र. १ याने मुळ अर्जाला आणि प्रस्तुत अर्जाला नि.क्र.१३ खाली आपले म्हणणे देवुन अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. सामनेवाला याने अर्जदार हिच्यासोबत लग्न झाल्याची व अर्जदार क्र.२ व ३ हे अपत्ये झाल्याची बाब मान्य केली आहे. परंतु अर्जदाराने त्याचेवर केलेले इतर सर्व आरोप नाकारले आहेत. त्याच्या मते तो व अर्जदार क्र.१ यांच्या विवाहाचा खर्च हा अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या नातेवाईकांनी निम्मा निम्मा केलेला आहे. सदर लग्नाच्या वेळी त्याच्या आईवडिलांनी अर्जदारास सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याचा नेकलेस तसेच पायातील चांदीच्या साखळया करुन दिलेल्या होत्या. सदर दागिणे हे अर्जदार क्र.१ हिचेकडे आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही त्याच्याकडे नांदण्यास आली. त्याठिकाणी ती ३ ते ४ महिने व्यवस्थित नांदली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही घरातील दैनंदिन कामाकडे दूर्लक्ष करुन सकाळी उशीरा उठत असे, भांडीकुंडी धुत नसे, जेवण देखील तयार करीत नसे. तसेच रोजच काहीना काही कारणावरुन त्याच्यासोबत भांडणतंटा करीत असे. तसेच त्याचेवर संशय घेत असे. परंतु त्याला अर्जदारासोबत प्रामाणीकपणे संसार करणेची इच्छा होती. परंतु अर्जदार क्र.१ हिस संसार करणेस रस नव्हता. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र.१ ही त्याच्यापासुन गरोदर राहीली. त्यावेळी त्याने तिची संपूर्ण काळजी घेतली, तिच्या बाळंतपणाचा संपूर्ण खर्च केला. त्यानंतर देखील अर्जदार क्र.१ हिच्या वागणुकीत बदल झाला नाही. तदनंतर २०१३ मध्ये अर्जदार क्र.१ पुन्हा गरोदर राहीली. त्यावेळी देखील त्याने अर्जदाराची चांगल्या प्रकारे काळजी घेतली. परंतु दूर्देवाने बाळाचा दि.२१/०५/२०१४ रोजी मृत्यू झाला. त्यावेळी अर्जदार क्र.१ ची आई, भाऊ व इतर नातेवाईकांनी सामनेवाला नं.१ ते ३ यांना जबाबदार धरुन भांडणतंटा करुन शिवीगाळ केली व अर्जदारास माहेरी घेऊन गेले. त्यानंतर दि.०८/०८/२०१४ रोजी सामनेवाले नं.१ ते ३ हे अर्जदारास समजावुन नांदण्यासाठी घेवुन आले. त्यानंतर अर्जदार क्र.३ याचा जन्म झाला. परंतु अर्जदाराच्या वागण्यात काहीएक बदल झाला नाही. ती तिचे मनमर्जीप्रमाणे वागत होती, ती हवे तेव्हा माहेरी निघुन जात होती, सामनेवाले यांना

जेलमध्ये टाकण्याची धमकी देत होती आणि कारण नसताना सामनेवाला नं.१ सोबत भांडण करीत होती. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने फेब्रुवारी २०१९ मध्ये सामनेवाल्यासोबत कामधंद्यावरुन वाद घालुन तिच्या माहेरी जावुन राहण्यासाठी हट्ट धरला. परंतु त्यास सामनेवाला नं.१ ने नकार दिल्यामुळे तिने सामनेवाला क्र.१ सोबत वाद घालुन तिची वहिणी अफसाना अशपाक शेख हिस बोलावुन घेतले व तिच्यासोबत दोन्ही मुलांना घेवुन माहेरी निघुन गेली. त्यानंतर दि.२०/०४/२०१९ रोजी सामनेवाला नं.१ ते ३ हे अर्जदाराच्या माहेरी जावुन तिला समजावुन नांदण्यासाठी सासरी घेवुन आले. त्यानंतर पुन्हा दि.०८/०६/२०२१ रोजी सामनेवाला नं.१ च्या कामधंद्यावरुन वाद घालुन माहेरी जावुन राहण्याचा हट्ट धरुन वाद घातला व माहेरी येवुन राहत नसाल तर तलाक द्या असे म्हणुन फारकतीची मागणी केली. तसे न केल्यास खोटया गुन्हयात अडकविण्याची धमकी दिली. त्यानंतर कोणालाही न सांगता तिचे सोन्याचांदीचे दागीने व दोन्ही मुलांना घेवुन माहेरी निघुन गेली. तेव्हापासुन ती माहेरी राहत आहे. तसेच अर्जदार क्र.१ हिने सामनेवाले यांना खर्चात टाकण्याच्या गैरउद्देशाने त्यांचेविरुध्द दि.०८/०९/२०२२ रोजी मेहुणबारे पोलीस ठाण्यात खोटी फिर्याद दिली. तसेच प्रस्तुतचा अर्ज देखील दाखल केला. सामनेवाला नं.१ ने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला नं.२ व ३ हे वयोवृध्द असुन त्यांचेकडुन कोणताही कामधंदा होत नाही. त्यांची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला नं.१ वर आहे. सामनेवाला क्र.१ हा सद्यस्थितीत किरणा दुकानावर तात्पुरत्या स्वरुपात मजुरीचे काम करीत असुन त्यापासुन त्याला दरमहा ६,०००/– पगार मिळतो. याउलट अर्जदार क्र.१ हिची माहेरची आर्थीक परिस्थिती सधन असुन तिच्या आईचा बांगडयांचा व्यवसाय आहे. अर्जदार क्र.१ देखील तिचे आईला व्यवसायात मदत करते त्यातुन त्यांना महिन्याकाठी रु.१०,०००/– मिळतात. अर्जदार क्र.१ हिच्या भावाकडे एक आयशर ट्रक असुन तो देखील मालवाहतुकीचे काम करतो. अर्जदार क्र१ ही तरुण व धडधाकट आहे तिला कोणताही आजार नाही. ती कामधंदा करुन स्वतःचा उदरनिर्वाह करु शकते. परंतु कोणतेही कारण नसताना तिने स्वतःहुन सामनेवाला क्र.१ याचा त्याग केला आहे. त्यामुळे तो अर्जदार यांना स्वतंत्र खावटी देवु शकत नाही. त्यामुळे त्याने प्रस्तुतचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली.

६) अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज व त्यावरील गैरअर्जदार यांचे म्हणणे वाचुन पाहीले. त्यानंतर अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. त्यानुसार खालील मुद्दे माझ्या विवेचनार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दे व त्यावरील कारणमिमांसासहीत माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमुद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही गैरअर्जदाराने तिच्यावरती कौटूंबिक हिंसाचार केला, हे प्रथमदर्शनी सिध्द करते ? | ...होय |
| २ | अर्जदारांच्या मागणीप्रमाणे ते अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती रुपये? | ...होय, अर्जदार क्र. १ ते ३ हे प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/– अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहेत. |
| ३ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**मुद्दा क्र. १ साठीः–**

**७)** अर्जदार हिने, सामनेवाल्यांनी तिचा कौटूंबिक हिंसाचार केला हे दाखविण्यासाठी प्रस्तुत अर्जामध्ये तिच्या अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. सदर कथनामध्ये तिने थोडक्यात असे सांगीतले आहे की, सामनेवाले हे संगनमताने अर्जदाराचा सतत शारीरिक व मानसिक छळ करीत असत, सामनेवाला क्र.१ हा अर्जदारास सतत शिवीगाळ करीत असे, तिचा अपमान करीत असे, तिला टोमणे मारीत असे, तिला मोलकरणी सारखी वागणुक देत असे. तसेच तिला वारंवार तलाक देण्याची धमकी देवुन तिला माहेरी पाठवुन देत असे. तसेच सामनेवाले हे नविन रिक्षा घेणेसाठी अर्जदाराकडे तिचे माहेरुन एक लाख रुपये आणावे अशी मागणी करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ करीत असत. त्यामुळे अर्जदारास नाईलाजास्तव माहेरी रहावे लागत आहे. तसेच अर्जदारास घरातुन हाकलुन देवुन पुन्हा नांदविण्याची तयारी दर्शविलेली नाही. त्याप्रमाणे सामनेवाला यांनी तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सबब, सदर कथने

प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या सोबत कौटूंबिक हिंसाचार केला असल्याचे दर्शवितात. त्याचप्रमाणे सुरक्षा अधिकारी यांनी नि.क्र.९ वरती त्यांचा अहवाल सादर करुन अर्जदाराच्या सर्व कथनांना दुजोरा दिलेला आहे. तसेच अर्जदाराने नि.क्र.३ सोबत अभिलेखावरती दाखल केलेला गु.र.नं.२०१/२०२२ वरील प्रथम खबरी अहवालाच्या छायांकीत प्रतीवरुनदेखील अर्जदाराच्या कथनास पुष्टी मिळते. त्याचप्रमाणे सामनेवाला यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये सध्या अर्जदार तिच्या माहेरी राहत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच अभिलेखावरुन सामनेवाला नं.१ हा अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही काळजी घेत असल्याचे दिसुन येत नाही. सबब, या सर्व बाबी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक हिंसाचार केला या अर्जदाराच्या कथनास पुष्टी देतात. त्याचप्रमाणे अर्जदार हिने अभिलेखावरती सामनेवाला क्र.१ याचा दुसरा विवाह झाल्याबाबतचा फोटो दाखल केला आहे. यावरुन सुध्दा सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिचा कौटूंबिक हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. सबब, मी प्रथमदर्शनी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक हिंसाचार केलेला असुन अर्जदार व्यथित व्यक्ती आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ साठीः–</u>**

८) अर्जदार हिने तिच्या प्रस्तुत अर्जामध्ये मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिला दरमहा रक्कम रु.१०,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांच्या उदरनिर्वाहासाठी सामनेवाला नं.१ याने प्रत्येकी दरमहा रक्कम रु.७,५००/– अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदार हिच्या मते सामनेवाला नं.१ याचे धुळे येथे सुपर बँगल्स या नावाने बांगडीचे दोन मजली दुकान असुन ते होलसेल आणि रिटेल मध्ये बांगडया आणि कॉस्मेटीक वस्तु विक्रीचा व्यापार करतात. त्यापासुन त्याला महिन्याला ७० ते ८० हजार रुपये उत्पन्न मिळते. शिवाय इतर सामनेवाला यांचे स्वतःचे व्यवसाय आहेत. तसेच सामनेवाला क्र.१ वर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सामनेवाला यांचेकडुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिला सामनेवाला नं.१ याने दरमहा रक्कम रु.१०,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांच्या प्रत्येकी दरमहा रक्कम रु.७,५००/– पोटगीची मागणी केलेली आहे. गैरअर्जदार याने तो

सद्यस्थितीत किरणा दुकानावर तात्पुरत्या स्वरुपात मजुरीचे काम करीत असुन त्यापासुन त्याला दरमहा ६,०००/– पगार मिळत असल्याचे नमुद केले आहे. परंतु गैरअर्जदार याच्या मते अर्जदार क्र.१ हिची माहेरची आर्थीक परिस्थिती सधन असुन तिच्या आईचा बांगडयांचा व्यवसाय आहे, अर्जदार क्र.१ देखील तिचे आईला व्यवसायात मदत करते त्यातुन त्यांना महिन्याकाठी रु.१०,०००/– मिळतात. अर्जदार क्र.१ हिच्या भावाकडे एक आयशर ट्रक असुन तो देखील मालवाहतुकीचे काम करतो. अर्जदार क्र.१ ही तरुण व धडधाकट आहे तिला कोणताही आजार नाही. ती कामधंदा करुन स्वतःचा उदरनिर्वाह करु शकते. सबब, गैरअर्जदार यांच्या मते अर्जदार ही पोटगी मागण्यास पात्र नाही.

९) अभिलेखावरील एकंदरीत प्रथमदर्शनी पुराव्यावरुन ही बाब स्पष्ट आहे की, अर्जदार ही माहेरी राहत असुन सामनेवाला क्र.१ याने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचा पिता आहे. त्यामुळे अर्जदारांना सांभाळण्याची त्याची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदाराची आर्थीक परिस्थिती सधन असल्याचे दाखविण्यासाठी अभिलेखावरती कोणताही प्रथमदर्शनी पुरावा उपलब्ध नाही. सबब, अर्जदार क्र. १ ते ३ हे सामनेवाला क्र.१ याच्या कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

१०) अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याचे मासिक उत्पन्न दर्शविण्यासाठी अभिलेखावरती सामनेवाला क्र.२ व ७ यांचे नावे असलेला मौजे धुळे येथील गट क्र. ४४७/१ मधील प्लॉट नं.४ चा उतारा दाखल केलेला आहे. परंतु सदर उता–यावरुन सदर घर हे अर्जदार हिचे सासरे व त्यांचे दोन भावांच्या नावे सामाईकात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर घरातुन सामनेवाला क्र.१ यास काही उत्पन्न मिळत आहे असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ हिने अभिलेखावरती सामनेवाला क्र.१ याचे सुपर बँगल्स नावाचे दुकान असल्याबाबत एक फोटो दाखल केलेला आहे. परंतु सदर फोटोवरुन सदर दुकान सामनेवाला क्र.१ याचेच आहे असे म्हणता येणार नाही. परंतु सामनेवाला नं.१ याने तो सद्यस्थितीत किरणा दुकानावर तात्पुरत्या स्वरुपात मजुरीचे काम करीत असुन त्यापासुन त्याला दरमहा ६,०००/– पगार मिळत असल्याचे त्याच्या खुलाशात मान्य

केले आहे. तसेच त्याच्या मते त्याच्या वरती त्याच्या वृध्द आईवडिलांची जबाबदारी आहे. असे असले तरी प्रचलित कायद्यानुसार सामनेवाला क्र.१ हा अर्जदारांना द्यावी लागणारी पोटगी चुकवु शकत नाही. अभिलेखावरुन सामनेवाला नं.१ हा तरुण व्यक्ती असल्याचे दिसुन येते. तसेच एखादी सुदृढ व्यक्ती कोणतेही काम करुन दिवसाला तिनशे ते पाचशे रुपये सहज कमावु शकते. त्यावरुन सदर व्यक्ती दरमहा ९०००/– ते १५०००/– रुपये कमावु शकते. सबब सामनेवाला क्र. १ याचे सदर मासिक उत्पन्न लक्षात घेता आणि त्याच्या वरती असलेल्या त्याच्या आईवडिलांची जबाबदारी लक्षात घेता तो अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/– मात्र अंतरिम पोटगी देऊ शकतो. सबब याप्रमाणे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर '**अंशतः होकारार्थी**' देत आहे.

मुद्दा क्र. ३ साठीः-

**११)** मुद्दा क्र. १ व २ च्या उत्तरास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

# आदेश

१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/– अंतरिम पोटगी म्हणुन सदरचा अर्ज दाखल तारेखपासुन मुळ अर्जाच्या अंतिम आदेशापावेतो द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

दि.२२/११/२०२३ **स्वा/–**

चाळीसगाव (एस.डी. यादव)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र. १, चाळीसगाव